# नियमित फौजदारी खटला क्रमांक ०५/२०२३

(CNR No. MHRT14-000467-2023)

(सरकार वि. जैनाब सिराजखान देशमुख )

## निशाणी २५४ वरील आदेश

## दिनांक ०७.०३.२०२४

१. प्रस्तुतचा अर्ज अभियोग पक्षाने खटल्यामध्ये जैनाबी देशमुख यांचे नावाने असलेल्या कुलमुखत्याराची मुळ प्रत मंदार सुरेंद्र गावकर यांच्या ताब्यात असण्याची शक्यता असल्याने सदर कागद हजर करणेबाबत आदेश देणे विषयी अर्ज दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज व म्हणणे वाचले. अभियोग पक्षातर्फे विद्ववान सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जामध्ये असे कथन करण्यात आले की, जैनाबी देशमुख यांच्या नावाने असलेल्या कुलमुखत्याराची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर कुलमुखत्याराच्या आधारे खरेदीखताने जमिन ही मंदार सुरेंद्र बावकर यांना देण्यात आलेली आहे. त्यामुळे मंदार सुरेंद्र बावकर यांच्या ताब्यामध्ये मुळ खरेदीखत व कुलमुखत्यारपत्राची प्रत असण्याची शक्यता आहे. तरी मंदार सुरेंद्र बावकर यांना खरेदीखत व कुलमुखत्यारपत्राची मुळ प्रत हजर करणेबाबत आदेश होणेची विनंती केली आहे. त्यामुळे भारतीय पुरावा अधिनियम चे कलम ६५ अन्वये मंदार सुरेंद्र गावकर यांना

या केसकामी सदरील कागदपत्राची मुळ प्रत हजर करणेचा आदेश होणेची विनंती केली आहे.

४. सदर अर्जावर आरोपीने आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रस्तुत केसमध्ये मंदार सुरेंद्र गावकर यांची या पुर्वीच साक्ष नि.क्र.२४० दि.२२/०८/२०२२ रोजी पुर्ण झालेली असून सदर वेळी मंदार सुरेंद्र गावकर यांनी फक्त खरेदीखतावर सह्या करणेसाठी ते आले होते व संपुर्ण व्यवहार त्यांचे मयत भाऊ केदार गावकर पहात होते असे नमुद केले आहे. सदर साक्षीवेळी अभियोग पक्षाने अर्जात नमुद दस्तऐवज मंदार सुरेंद्र गावकर यांचेकडे असलेबाबत कोणतेही सुतोवाच केलेले नाही.

५. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, पोलिसांनी तपासकाम पुर्ण करुन उपलब्ध कागदपत्रांसहित आरोपविरुध्द गुन्हा दाखल केला असून आता नव्याने कागदपत्रांची मागणी सरकार पक्षाने करणे हे निव्वळ वेळ काढूपणाचे लक्षण असून कायद्याविरुध्द आहे. अशा प्रकारे तपासकाम पुर्ण झाल्यानंतर कोणत्या तरतुदीनुसार अर्ज केला आहे याबाबत अभियोग पक्षाने कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. सबब, सदरचा अर्ज कायद्यानुसार नसल्याने अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

६. अभियोग पक्षाने साक्षीदार मंदार सुरेंद्र गांवकर यांच्या ताब्यामध्ये वादातीत असणारे मुळ कुळमुखत्यारपत्र व खरेदीखत साक्षीदार यांच्या ताब्यामध्ये

.... ३ .......

असल्याची शक्यता असल्याचे कथन केले आहे. याउलट, आरोपी यांनी मंदार गांवकर यांची साक्ष झाली असून मुळ कुळमुखत्यारपत्र व खरेदीखत त्यांच्या ताब्यात असलेबाबत त्यांचे झालेल्या पुराव्यामध्ये कथन केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये श्री. मंदार गावकर यांच्या ताब्यामध्ये मुळ कुळमुखत्यारपत्र व खरेदीखत आहे की नाही याबाबत साशंकता निर्माण होते त्यामुळे सदरचे मुळ कुळमुखत्यारपत्र व खरेदीखत साक्षीदार यांनी न्यायालयात हजर करणेबाबत आदेश करणेपुर्वी साक्षीदार मंदार सुरेंद्र गांवकर याचे म्हणणे ऐकून घेवून प्रस्तुत अर्जावर आदेश करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश करणेत येत आहे.

## आदेश

साक्षीदार मंदार सुरेंद्र गांवकर यास प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करणेकरीता नोटीस काढण्यात यावी.

**(एम. ए. शिंदे)**

**ठिकाण – मंडणगड.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंडणगड,**
**दिनांक –०३/०४/२०२४.** **तालुका मंडणगड.**

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. D. R. Joshi |
| Date of Decision | :- | 03/04/2024. |
| Signed by P.O. on | :- | 03/04/2024. |
| Uploaded on | :- | 04/04/2024. |

.... .......